महाराष्ट्र शासनाचा २०१३-१४ या वर्षाचा
अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

# श्री. अजित पवार

उपमुख्यमंत्री (वित्त)

यांनी बुधवार, दिनांक २० मार्च २०१३ रोजी
केलेले भाषण

## भाग दुसरा

माननीय अध्यक्ष महोदय,

मी आता अर्थसंकल्पाचा भाग दोन सभागृहापुढे सादर करीत आहे.

विक्रीकर संकलनाचा आढावा.

१. मागील आर्थिक वर्षात विविध कारणांमुळे भारतीय अर्थव्यवस्था अपेक्षित विकास दर गाठू शकली नाही. या पार्श्वभूमीवर विक्रीकर विभाग कर महसूलाचे ६१,५५७ कोटी रुपये हे सुधारीत उद्दिष्ट ओलांडेल, ही समाधानाची बाब आहे.

विक्रीकर विभागाच्या संगणकीकरणाचे अत्याधुनिकीकरण

२. विक्रीकर संकलन प्रभावी करण्यासाठी विक्रीकर विभागामध्ये मोठ्या प्रमाणात संगणकीकरण करण्यात आले आहे. आगामी काळात संगणकीकरण अत्याधुनिक करुन कर प्रशासन अधिक प्रभावी करण्यात येईल.

संगणकीकरणामुळे इलेक्ट्रॉनिक स्वरुपात मोठ्या प्रमाणात माहिती उपलब्ध होते. या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी विक्रीकर विभागात आर्थिक बुद्धीसंपदा शाखा कार्यरत आहे. याचा उपयोग करचुकवेगिरिस आळा घालण्याकरिता व महसूल वाढविण्याकरिता होत आहे.

संगणकीय स्वरुपात ठेवलेल्या लेखा पुस्तकांमध्ये फेरफार करुन करचुकवेगिरी होत असेल तर ती शोधून काढण्याकरिता " सायबर फोरेंसिक लॅबोरेटरीची " स्थापना विक्रीकर विभागात करण्यात आली आहे. विक्रीकर विभागाच्या वरील उपक्रमामुळे करचुकवेगिरीचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होईल असा मला विश्वास आहे.

आता विक्रीकर विभागाजवळ करचुकवेगिरी करणाऱ्या व्यापाऱ्यांची माहिती उपलब्ध असून करचुकवेगिरी करणाऱ्या सर्व व्यापाऱ्यांवर यापुढेही कडक कारवाई करण्यात येईल.

मूल्यवर्धित कर कायद्यातील काही बदल

३. मूल्यवर्धित कर कायद्यात मी काही बदल प्रस्तावित करीत आहे.

लेखापालांनी केलेल्या लेखा परिक्षणानंतर अथवा विक्रीकर विभागाच्या व्यवसाय लेखा परिक्षणानंतर काही त्रुटी आढळून आल्यास, वारंवारितेनुसार सादर केलेली संपूर्ण विवरणपत्रे सुधारित न करता संपूर्ण वर्षाकरिता एक सुधारित विवरणपत्र सादर करता येईल.

विवरणपत्र कसूरदार व्यापाऱ्याने विवरणपत्र दाखल केले नाही म्हणून पारित केलेला एकतर्फी निर्धारणा आदेश, व्यापाऱ्याने विवरणपत्रे दाखल केल्यावर रद्द करण्याकरिता सुटसुटीत पध्दत अवलंबिण्यात येईल.

याबरोबरच, इतर मद्याप्रमाणे वाईनवर देखील पहिल्या टप्प्यावर कर लावण्यासंदर्भात सुधारणा, कलम २ व कलम ६१ मधील तांत्रिक सुधारणा, कंपनी सेक्रेटरीला विक्रीकर विभागातील अधिकाऱ्यापुढे प्रतिनिधीत्व करण्याचे अधिकार, एका आर्थिक वर्षात व्यापाऱ्याचे रुपये शंभर पर्यंतचे करदायित्व वसूल न करणे अशा सुधारणांचा समावेश आहे.

एखाद्या विशिष्ट परिस्थितीत काही वर्गांच्या करदात्यांस विहित मुदतीत विवरणपत्र सादर करता आले नाही तर शासन विलंब शुल्क माफ अथवा कमी करु शकेल.

सनदी लेखापाल अथवा परिव्यय लेखापालाने लेखा परिक्षण केल्यानंतर व्यापाऱ्यास सुचविलेला व त्याने मान्य केलेला कर व्याजासकट थेट मागणीपत्र बजावून वसूल करण्याची तरतूद करण्यात येत आहे.

विक्रीकराच्या परतावा पद्धतीत सुलभता.

४. मूल्यवर्धित कर प्रणालीमध्ये केंद्रीय विक्रीकराचा दर कमी असल्यामुळे परतावा अनुज्ञेय असणाऱ्या व्यापाऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. हा परतावा लवकर देणे आवश्यक आहे म्हणून व्यापाऱ्यांच्या सोयीकरिता एका आर्थिक वर्षातील रुपये पाच लाखांपर्यंतचा परतावा पुढील आर्थिक वर्षात समायोजित करता येईल, असे मी जाहीर करतो.

परताव्यासाठीच्या अर्जांच्या प्राथमिक तपासणीनंतर व्यापाऱ्यांना अनुज्ञेय असलेला अंशतः परतावा नमुना ७०४ मधील लेखापरिक्षण अहवाल सादर करण्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत प्रदान करण्यात येईल.

औद्योगिक विकास अनुदान अनुज्ञेय असणारे विशाल प्रकल्प तसेच मागील वर्षात ज्या व्यापाऱ्यांची आंतरराज्य विक्री एकूण विक्रीच्या पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक असेल अशा व्यापाऱ्यांना परतावा लवकर प्राप्त होण्याकरिता कलम ५१ मध्ये सुधारणा प्रस्तावित आहे.

अध्यक्ष महोदय, मी आता करविषयक प्रस्ताव सभागृहापुढे सादर करीत आहे.

तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांवर कर वाढ.

५. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ आरोग्यास अपायकारक असून त्याच्या सेवनाला आळा घालणे आवश्यक आहे. यामुळेच राज्यात गुटख्याच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. इतर प्रकारच्या तंबाखू सेवनास आळा बसावा, यास्तव, मी, सिगारेटवरील कराचा दर वीस टक्क्यांवरुन पंचवीस टक्के व बिडीवरील कराचा दर पाच टक्क्यांवरुन साडेबारा टक्के करण्याचे प्रस्तावित करीत आहे. छोट्या पुड्यांमध्ये ब्रॅन्ड नावाखाली विकण्यात येणाऱ्या तंबाखूवर साडेबारा टक्के दराने कराची आकारणी करण्यात येते. तथापि, राज्यात इतर अनुत्पादित तंबाखू कर मुक्त आहे. मी सर्व प्रकारच्या अनुत्पादित तंबाखूवर साडेबारा टक्के कर लावण्याचे प्रस्तावित करीत आहे.

औद्योगिक वापराच्या कापडावर कर आकारणी.

६. मागील वर्षाच्या अर्थसंकल्पात केवळ फर्निशिंग कापडाच्या अंतिम टप्प्याच्या विक्रीवर पाच टक्के कर आकारणी करण्यात आली. यावर्षी देखील मी सर्व प्रकारच्या कापडावर कर न लावता केवळ औद्योगिक वापराच्या कापडावर पाच टक्के कर लावण्याचे प्रस्तावित करीत आहे.

मद्यार्क विरहित पेयासाठीच्या भुकटी, गोळ्या व क्यूब्सवर कर वाढ.

७. काही प्रकारची भुकटी, गोळ्या व क्यूब्सपासून मद्यार्क विरहित पेय बनविण्यात येते. या वस्तूंवर असलेला पाच टक्के कराचा दर वाढवून तो साडेबारा टक्के करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

सोने, चांदी व इतर मौल्यवान धातूंच्या औद्योगिक वापराच्या वस्तू व उपकरणांवर कर वाढ.

८. सोने, चांदी व इतर मौल्यवान धातूंवरील कराचा दर एक टक्का आहे. काही औद्योगिक वापराच्या वस्तू व उपकरणांवर देखील या नोंदीखाली एक टक्का दराने कर आकारणी होते. सदर नोंदीतून औद्योगिक वापराच्या वस्तू व उपकरणे काढण्यात येत असून त्यावर पाच टक्के दराने कर आकारण्याचे प्रस्तावित आहे.

पेव्हर ब्लॉक्स वरील करात वाढ.

९. पेव्हर ब्लॉक्स वरील कराचा दर पाच टक्के आहे. रस्ते बांधणीला लागणाऱ्या बहुतेक वस्तूंवरील कराचा दर साडेबारा टक्के आहे. यास्तव, पेव्हर ब्लॉक्सवरील कराचा दर मी साडे बारा टक्के करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

सर्व प्रकारची सौंदर्य प्रसाधने व शाम्पूवरील करात वाढ.

१०. सर्वसाधारणपणे सौंदर्य प्रसाधने व शांपूवर साडेबारा टक्के दराने कराची आकारणी होते. तथापि, काही सौंदर्य प्रसाधने व शांपूची विक्री औषधी म्हणून केली जाते त्यामुळे त्यांच्या विक्रीवर पाच टक्के कर लागू होतो. या वस्तूंवरील कराचा दर साडेबारा टक्के करण्याचे प्रस्तावित आहे.

भाडे तत्वावर प्रवासी वाहने विक्री करणाऱ्या कंपन्यांना मिळणारी प्रवासी वाहनांवरील कराची वजावट रद्द.

११. प्रवासी वाहतूकीच्या वाहनांच्या खरेदीवर मूल्यवर्धित कर कायद्यातील नियमांनुसार वजावट उपलब्ध नाही. तथापि, भाडे तत्वावर विक्री करणाऱ्या कंपन्यांनी प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाड्यांची खरेदी करून, भाडे तत्वावर विक्री केल्यास, त्या कंपनीस पूर्ण वजावट अनुज्ञेय आहे. सदर वजावट यापुढे मिळणार नाही असे मी जाहीर करतो.

दुष्काळ निवारण निधी.

१२. यावर्षी राज्याच्या काही भागास तीव्र दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. दुष्काळी परिस्थितीच्या निवारणासाठीचा मोठा खर्च भागविण्यासाठी तात्पुरती उपाययोजना म्हणून सोने, चांदी, हिरे, मौल्यवान धातू व त्यापासून बनविण्यात येणाऱ्या दागिन्यांवर एक टक्क्याऐवजी १.१० टक्के कराची आकारणी प्रस्तावित आहे.

तसेच ऊसाच्या शेतीसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर होतो. याचा विचार करुन ऊस खरेदी कराच्या सध्याच्या तीन टक्के दराऐवजी मी पाच टक्के कर प्रस्तावित करीत आहे. ऊस खरेदीकराची वसूली दर महिन्याला होणाऱ्या साखर विक्रीतून प्रति किलो ५० पैसे प्रमाणे केली जाते. त्याऐवजी ऊस खरेदीकराची वसूली प्रति किलो एक रुपयाप्रमाणे केली जाईल.

हे दोन्ही कर प्रस्ताव एका वर्षासाठीच लागू असतील.

लॉटरीच्या सोडतीवरील करात वाढ.

१३. मागील काही काळात लॉटरी व्यवसायात लक्षणीय वाढ झाली आहे. तथापि, लॉटरी करात वाढ करण्यात आलेली नाही. यापुढे साप्ताहिक लॉटरी योजनेवर रुपये साठ हजार कर लागेल.

पाक्षिक लॉटरी अथवा सप्ताह व पंधरवडा यांच्यामध्ये होणाऱ्या कोणत्याही लॉटरी योजनेवर रुपये एक लाख पंचवीस हजार कर लागेल.

मासिक लॉटरी योजना किंवा पंधरवड्याहून अधिक असणाऱ्या कोणत्याही कालावधीच्या कोणत्याही लॉटरी योजनेवर रुपये दोन लाख पन्नास हजार कर लागेल.

भव्यतम (बंपर) लॉटरी योजनेवर रुपये बारा लाख कर लागेल.

वित्तीय संस्थांकडून यथोचित मुद्रांक शुल्क वसूल करणे.

१४. विविध वित्तीय संस्था, बँका तसेच नॉन बँकिंग फायनान्स कंपन्या यांच्या लाभात केल्या जाणाऱ्या अनेक दस्तऐवजांवर यथोचित मुद्रांक शुल्क भरले जात नसल्याने मुंबई मुद्रांक अधिनियमात सुधारणा करण्यात येत आहे.

वित्तीय संस्था जर दस्तऐवजात एक पक्षकार असेल किंवा दस्त त्यांच्या लाभात केला गेला असेल तर संबंधित दुसऱ्या पक्षकाराकडून वसूल करण्याच्या संस्थेच्या हक्कास बाधा न येता, शासनास यथोचित मुद्रांक शुल्क भरण्याची जबाबदारी वित्तीय संस्थेची राहील.

प्रस्तावित सुधारणा अंमलात येण्याच्या दिनांकास जर वित्तीय संस्थांकडे यथोचित मुद्रांक शुल्क न भरलेले प्रभावी दस्तऐवज असतील तर असे दस्तऐवज दिनांक ३० सप्टेंबर २०१३ पर्यंत अवरुद्ध करुन जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्याची जबाबदारी संबंधित वित्तीय संस्थेची राहील. तथापि, दिनांक ३० सप्टेंबर २०१३ पर्यंत यथोचित मुद्रांक शुल्क भरले गेल्यास अवरुद्ध करण्याची आवश्यकता राहणार नाही. परंतु यथोचित मुद्रांक शुल्क दिनांक ३० सप्टेंबर २०१३ पर्यंत न भरलेले दस्तऐवज अवरुद्ध न केल्यास संबंधित वित्तीय संस्थांवर चुकविलेल्या मुद्रांक शुल्काएवढी शास्ती लादण्यात येईल.

**प्रदेय मुद्रांक शुल्क पूर्णांकित करणे.**

१५. दस्तऐवजांचे मुद्रांक शुल्क निश्चित करताना प्रदेय मुद्रांक शुल्क शंभर रुपयांहून अधिक परिगणीत होत असल्यास, पन्नास रुपये व त्याहून अधिक असलेल्या रकमेचे पुढील शंभर रुपयांत पूर्णांकन करण्यात येईल. तथापि ही रक्कम पन्नास रुपयांहून कमी असल्यास ती हिशेबात घेतली जाणार नाही.

**नोंदणीकृत विक्री करारावर मानीव अभिहस्तांतरण पत्राप्रमाणे मुद्रांक शुल्क भरले असल्यास, अभिहस्तांतरण पत्रावर रुपये १०० मुद्रांक शुल्क आकारणे.**

१६. नोंदणीकृत विक्री कराराच्या दस्तऐवजावर मानीव अभिहस्तांतरण पत्रामध्ये यथोचित मुद्रांक शुल्क भरले गेले असल्यास व तद्नंतर त्या करारात कोणताही बदल न होता, निष्पदित होणाऱ्या अभिहस्तांतरण पत्रास कलम ४ प्रमाणे पुरवणी दस्त असे गृहित धरुन शंभर रुपये एवढे मुद्रांक शुल्क आकारण्यात येईल व त्याप्रमाणे अनुषंगिक सुधारणा अनुच्छेद २५ मध्ये करण्यात येईल.

**संमती-नि-परवानगीच्या दस्तांसाठी विविध मुद्रांक शुल्क दर आकारणीत सुसूत्रीकरण.**

१७. संमती-नि-परवानगीच्या दस्तांसाठी मुद्रांक शुल्काची आकारणी, विविध रकमेवर भिन्न दराने व क्षेत्रनिहाय करण्याच्या पध्दतीत सुसूत्रीकरण करण्यात येत आहे. राज्यातील सर्व क्षेत्रांसाठी अशा दस्तांवर, कराराच्या संपूर्ण कालावधीसाठी भाड्याची एकत्रित रक्कम, विना परतावा अनामत रक्कम व परतावा अनामत रकमेवर कराराच्या एकूण कालावधीसाठी दहा टक्के प्रतिवर्षी दराने अनुज्ञेय व्याज अशा पद्धतीने परिगणीत होणाऱ्या एकूण रकमेवर ०.२५ टक्के दराने मुद्रांक शुल्क आकारले जाईल.

**देशी, विदेशी मद्य व तीव्र बिअरच्या उत्पादन शुल्कात वाढ.**

१८. देशी, विदेशी मद्य व तीव्र बिअर वरील उत्पादन शुल्काच्या कर रचनेत काही बदल प्रस्तावित आहेत.

देशी मद्यावरील उत्पादन शुल्काचा न्यूनतम दर पंच्याण्णव रुपये प्रति प्रूफ लिटर वरुन एकशे दहा रुपये प्रति प्रूफ लिटर इतका राहील.

विदेशी मद्यावरील उत्पादन शुल्काचा न्यूनतम दर दोनशे चाळीस रुपये प्रति प्रूफ लिटरवरुन तीनशे रुपये प्रति प्रूफ लिटर इतका राहील.

तीव्र बिअरवरील उत्पादन शुल्काचा दर बेचाळीस रुपये प्रति बल्क लिटर किंवा निर्मिती मूल्याचा १७५ टक्के यापैकी जे जास्त असेल त्याऐवजी साठ रुपये प्रति बल्क लिटर किंवा निर्मिती मूल्याच्या २०० टक्के यापैकी जे जास्त असेल ते राहील.

भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याच्या निर्यात शुल्काच्या दरात वाढ.

१९. भारतीय बनावटीचे विदेशी मद्य परराज्यात निर्यात करण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या निर्यात शुल्काच्या दरात वाढ प्रस्तावित करण्यात येत आहे. तथापि ही वाढ कॅन्टीन स्टोअर्स डिपार्टमेंटना लागू असणार नाही.

किरकोळ विक्रीची कमाल किंमत पाचशे रुपयेपेक्षा कमी असलेल्या मद्यावरील निर्यात शुल्क सध्याच्या एक रुपया प्रति बल्क लिटर ऐवजी तीन रुपये प्रति बल्क लिटर राहील.

किरकोळ विक्रीची कमाल किंमत पाचशे रुपये किंवा त्यापेक्षा जास्त असलेल्या मद्यावरील निर्यात शुल्क सध्याच्या पाच रुपये प्रति बल्क लिटर ऐवजी दहा रुपये प्रति बल्क लिटर राहील.

अध्यक्ष महोदय, मी आता कर सवलतीचे प्रस्ताव सभागृहापुढे सादर करीत आहे.

जीवनावश्यक वस्तू, बेदाणे व मनुका कर मुक्त.

२०. राज्यात काही जीवनावश्यक वस्तू जसे तांदूळ, गहू, डाळी व त्यांचे पीठ, हळद, मिरची, चिंच, गूळ, नारळ, धणे, मेथी, सुवा, पापड, ओला खजूर, सोलापूरी चादर व टॉवेल्स यांवर दिनांक ३१ मार्च, २०१३ पर्यंत करात सूट देण्यात आली आहे. सदर सूट दिनांक ३१ मार्च, २०१४ पर्यंत चालू ठेवण्याचे मी घोषित करीत आहे. बेदाणे व मनुकांवरील कर सवलत देखील दिनांक ३१ मार्च, २०१४ पर्यंत सुरु राहील.चहावरील सवलतीचा पाच टक्के कराचा दरही दिनांक ३१ मार्च, २०१४ पर्यंत चालू राहील.

दूधावरील कर माफ.

२१. नित्य वापराच्या दूधाची विक्री करमुक्त आहे. तथापि, दूधामध्ये काही घटक मिसळल्यास त्यावर पाच टक्के दराने कर आकारणी होते. दूधाची गुणवत्ता प्रमाणकानुसार ठेवण्यासाठी दूधाची भुकटी, एसएनएफ अथवा फॅट मिसळण्यात येतात. तथापि, काही न्याय निवाड्यांमुळे दूधात वरील पदार्थांच्या मिश्रणामुळे पाच टक्के कर आकारणी लागू झाली. अशा दूधावर कर लावण्याचा शासनाचा कधीही मानस नव्हता. यास्तव अशा दूधाच्या विक्रीवर दिनांक १ एप्रिल, २००५ पासून कर लागणार नाही.

अंधासाठीच्या ब्रेल घड्याळांवर व अपंगांच्या काही वाहनांवर कर माफी.

२२. अंधांसाठी बनविण्यात येणाऱ्या ब्रेल घड्याळांवर व अपंगांच्या काही वाहनांवर कराचा दर साडे बारा टक्के आहे. सदर घड्याळे व अपंगासाठींची काही वाहने करमुक्त करण्याचे मी घोषित करीत आहे.

राईस ब्रान करमुक्त.

२३. राज्यात धानाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर असून ही शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून आहे. धानापासून तांदूळ तयार करताना राईस ब्रानचे उप-उत्पादन होते. तांदूळ करमुक्त आहे. म्हणून राईस ब्रान देखील मी करमुक्त करीत आहे.

वॉटर मीटर व हात पंप कर मुक्त.

२४. पाण्याचा वापर काटकसरीने व्हावा म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत वॉटर मीटर्स बसविण्यात येत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांना विकण्यात येणाऱ्या वॉटर मीटर्सवरील कर मी माफ करीत आहे.

ग्रामीण भागामध्ये कूपनलिकेतून पाणी काढण्यासाठी हातपंपाचा वापर केला जातो. अशा हातपंपावरील कर माफ करण्यात येत आहे.

एआयसीडी हार्ट इम्प्लान्टवरील करात सवलत.

२५. हृदय रुग्णांना दिलासा देण्यासाठी एआयसीडी हार्ट इम्प्लॉन्टवरील कराचा दर साडे बारा टक्क्यावरुन पाच टक्के करण्याचे प्रस्तावित आहे.

नॉन ज्युडीशियल स्टॅम्प पेपर व पोस्टाच्या संग्राह्य (फिलाटेलीक) वस्तूंवर कर माफी.

२६. सरकारमान्य अधिकृत विक्रेत्याने केलेल्या नॉन ज्युडीशिअल व ज्युडीशिअल स्टॅम्प पेपर व मुद्रांक शुल्कांच्या तिकीटांची विक्री करमुक्त असेल हे मी स्पष्ट करीत आहे.

अनेक विद्यार्थ्यांना जुनी पोस्टाची तिकीटे, लिफाफे, फर्स्ट डे कव्हर इत्यादी वस्तूंचा संग्रह करण्याचा छंद असतो. सदर छंदाला प्रोत्साहन देण्याकरिता मी सर्व प्रकारच्या पोस्टाच्या संग्राह्य (फिलाटेलीक) वस्तूंवर संपूर्ण कर माफी जाहीर करीत आहे.

फर्निशिंग कापडाची आंतरराज्य विक्री कर मुक्त.

२७. फर्निशिंग कापडाच्या अंतिम विक्रीवर पाच टक्के विक्रीकर लागू आहे. यामुळे फर्निशिंग कापडाच्या " क " नमुन्याशिवाय आंतरराज्य विक्रीवर पाच टक्के कर लागू झाला आहे. फर्निशिंग कापडाच्या आंतरराज्य विक्रीवरील करामुळे मोठ्या प्रमाणात राज्यातील कापड उद्योग इतर राज्यात स्थलांतरित होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. म्हणून फर्निशिंग कापडाच्या आंतरराज्य विक्रीला मी कर माफी जाहीर करीत आहे.

काही उत्खनन यंत्रावरील करात सवलत.

२८. उत्खनन यंत्रावर (एक्सकॅव्हेटर) साडे बारा टक्के दराने कराची आकारणी होते. अनेकदा या यंत्राची खरेदी करणारे व्यापारी केंद्रीय विक्रीकर कायद्याखाली नमुना " क " देण्यास पात्र नसतात. अनेक राज्यांमध्ये यावरील कराचा दर पाच टक्के असल्यामुळे राज्यातील उत्पादकांवर याचा विपरित परिणाम होतो. म्हणून ज्या उत्खनन यंत्रांना मोटार वाहन नोंदणी लागू होत नाही अशा उत्खनन यंत्रांवरील कराचा दर साडे बारा टक्क्यांऐवजी पाच टक्के करण्याचे घोषित करीत आहे.

जुन्या ट्रॅक्टर विक्रीकरिता आपसमेळ योजना.

२९. जुन्या मोटार वाहनांची विक्री केल्यास त्याकरिता विक्रीकराची आपसमेळ योजना आहे. या योजनेमध्ये मी आता ट्रॅक्टरचा देखील समावेश करीत आहे.

अध्यक्ष महोदय, या वर्षीच्या तीव्र दुष्काळाच्या निवारणासाठी तात्पुरत्या स्वरुपाची कर आकारणी प्रस्तावित केली आहे. या व्यतिरिक्त विविध विकास योजनांना लागणाऱ्या अतिरीक्त महसुलाची गरज लक्षात घेऊन काही प्रमाणात कर वाढ पण करण्यात आली आहे. माझ्या या कर प्रस्तावांमुळे महसुलात अकराशे पन्नास कोटी रुपयांची वाढ होणे अपेक्षित आहे. सदर वाढ ही सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात अंतर्भूत केली आहे.

मला आशा आहे की, माझ्या वरील प्रस्तावाला या सभागृहाची मान्यता मिळेल.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**